# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा**

## संशोधन आराखडा

**संशोधन विषय**

## ''बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास''

**संशोधक विद्यार्थी**
**संतोष सिताराम सोंडगे**
एम.ए., बी.एड., सेट, नेट, (भूगोल)

**संशोधन मार्गदर्शक**
**प्रा.डॉ. एन.के. वाघमारे**
(एम.ए., सेट, पीएच.डी.)
भूगोल विभागप्रमुख,
इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, नांदेड

**संशोधन केंद्र**
**भूशास्त्र संकुल,**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**जुलै - २०१५**

# ''बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास''

## १) प्रस्तावना (Introduction)

भूगोल विषयाच्या अभ्यासाला जेव्हा सुरूवात झाली तेव्हा प्रामुख्याने पर्यावरणातील प्राकृतिक घटकांच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान होते. परंतु काळ जसा बदलु लागला तसे मानवी घटकाचे देखील महत्त्व वाढत गेले. यातूनच मानवाचा अभ्यास होण्यास सुरूवात झाली. आणि प्राकृतिक पर्यावरणावर मानवाचा होणारा परिणाम याविषयी अभ्यास होऊ लागला. या अभ्यासातूनच भूगोलामध्ये मानवी भूगोलाचा एका स्वतंत्र शाखेच्या रूपाने जन्म झाला. पुढे चालून सामाजिक शास्त्राच्या माध्यमातून मानवी भूगोलाच्या एक एक नवीन उपशाखा स्वतंत्र क्षेत्र म्हणून वेगळ्या होत गेल्या. यातूनच इ.स. १९५३ मध्ये जी.टी.त्रिवार्था यांनी अमेरिकन भूगोल परिषदेत लोकसंख्या भूगोलास क्रमबद्ध भूगोलाच्या एका शाखेच्या रूपात प्रस्तुत केले. म्हणजेच भूगोल विषयात लोकसंख्या भूगोल या नवीन शाखेचा उदय झाला.

मानवाच्या जीवनातील लोकसंख्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन लोकसंख्येच्या विविध अंगाचा तपशीलवार व सूक्ष्म अभ्यास केला जाऊ लागला. लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या वाढ, लिंग प्रमाण, वयोगट रचना, आयुर्मान, लोकसंख्या घनता, धर्म, भाषा, जाती व्यवस्था व त्यांचे प्रमाण, साक्षरता, वैवाहिक स्थिति, व्यावसाय, उद्योग व त्यांचे वर्गीकरण इत्यादी घटकांविषयी सविस्तर अभ्यास केला जाऊ लागला.

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण व लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. देशातील जन्मदर, मृत्युदर, स्थलांतर, स्त्री-पुरूष प्रमाण, साक्षरता या लोकसंख्येच्या अंगातील वाढती असमानता ही लोक संख्येच्या समस्या निर्मितीस कारणीभूत ठरत असते. तेव्हा उद्‌भवणाऱ्या समस्या लक्षात घेता देशातील लोकसंख्येची अद्ययावत माहिती घेणे आवश्यक असते. लोकसंख्येच्या अद्ययावत

सांख्यिकीय माहितीच्या आधारे देशातील लोकसंख्येच्या असलेल्या संभाव्य समस्यांचा आढावा व भविष्यातील अचूक नियोजन करणे शक्य होते.

लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचना हे घटक लोकसंख्या अभ्यासामध्ये अतिशय महत्वपूर्ण असून, लोकसंख्या लिंगगुणोत्तर म्हणजे एकूण लोकसंख्येतील स्त्री-पुरूष प्रमाण होय. लिंग रचना ही जीवशास्त्रीय निकषावरून स्पष्ट ओळखू येणारी रचना असून सामाजिक आरोग्य संतुलनासाठी दोन्हींची समानता आवश्यक असते.

निसर्गतः स्त्री-पुरूष प्रमाण समान ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु, आजही अनेक देशांमध्ये स्त्री-पुरूष प्रमाण असमान आहे. आपल्या देशामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे पुरूषांच्या प्रमाणात नेहमीच कमी राहिलेले पहावयास मिळते. त्याचप्रमाणे आपल्या महाराष्ट्र राज्यात देखील वेगळी परिस्थिती नसून विशेषतः बीड सारख्या विकासाच्या दृष्टीने मागास असलेल्या जिल्ह्यामध्ये स्त्री-पुरूष प्रमाण खुपच विषम आहे. याचा खुप मोठा परिणाम तेथील समाज व्यवस्थेवर होताना दिसत आहे. तसेच मानवाच्या जीवनामध्ये व्यावसायाला देखील अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण व्यावसायावरच मानवाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. म्हणून बीड जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करून तेथील लिंगगुणोत्तर, लिंग गुणोत्तरावर परिणाम करणारे घटक आणि लिंग गुणोत्तर असमान असण्याची विविध कारणे त्याच बरोबर तेथील लोकांचा व्यावसाय, व्यावसायावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास करण्यासाठी मी माझ्या संशोधनाचा विषय ''बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास'' हा निवडला आहे.

### २) अभ्यास विषयाचे महत्त्व : (Significance of the study):

मराठवाड्यातील बीड जिल्ह्याच्या लोकसंख्या लिंगगुणोत्तराचा अभ्यास सखोलपणे आतापर्यंत केला गेला नाही. त्यामुळे जिल्ह्याच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन सदर विषयाची निवड केली गेली. बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५ लाख ८६ हजार

(२०११) एवढी आहे. यापैकी १९.९ टक्के लोकसंख्या ही शहरी भागात राहत असून ८०.१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करत आहे. लोकसंख्येच्या रचनेचा अभ्यास करताना लिंगरचनेमध्ये असणारी तफावत विशेष लक्षात येते. ही स्त्री-पुरूष प्रमाणात असणारी तफावत समाजव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. २०११ च्या जनगणनेनुसार स्त्रियांचे प्रमाण १००० पुरूषामागे फक्त ९१२ एवढेच आहे. एवढेच नाही तर बालकांचे लिंग गुणोत्तर (० ते ६ वर्षे वयोगटातील) बघितले असता ही एक मोठी समस्याच निर्माण झालेली दिसून येते, कारण १००० मुलांमागे मुलींचे प्रमाण हे फक्त ८०१ एवढे कमी आहे.

२०११ च्या जनगणनेनंतर बीड जिल्ह्याची एक वेगळीच ओळख निर्माण झाली आहे, ती म्हणजे ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तरामध्ये महाराष्ट्रातील सर्वात कमी लिंग गुणोत्तर असणारा जिल्हा. ही समस्या का निर्माण झाली आहे, लिंग गुणोत्तर कमी असण्याची कोणती कारणे आहेत यांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. जिल्ह्याचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साध्य करण्यासाठी या संशोधनातून बदलत्या लिंग प्रमाणातील असमानतेच्या विविध कारणांचा शोध घेऊन लिंग प्रमाणातील असमानता नष्ट करता येईल हाच संशोधनाचा हेतु आहे. तसेच या संशोधनातून लिंग प्रमाणातील असमानतेच्या विविध कारणांचा शोध घेऊन त्याचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

मानवी जीवनामध्ये व्यवसायाला देखील तेवढेच महत्त्व आहे. कारण त्या त्या देशातील किंवा राज्यातील व्यावसायिक स्थितीवरून त्या ठिकाणच्या प्रगतीचा किंवा अधोगतीचा अंदाज येतो. ज्या देशात अधिक प्रमाणात प्राथमिक व्यवसायाचा विकास झालेला असतो असे देश आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतात. तर याउलट ज्या देशात द्वितीयक, तृतीयक व चतुर्थक श्रेणीतील व्यावसायांचा विकास झालेला असतो, त्या देशात अधिक प्रगती झाल्याचे आढळून येते. थोडक्यात व्यावसायिक विकासावर आर्थिक, सामाजिक व सर्वांगिण विकास अवलंबून असतो. म्हणून त्या त्या देशातील व्यावसायिक

रचना कशा प्रकारची आहे हे माहित असणे गरजेचे असते. या प्रमाणे बीड जिल्ह्यातील व्यावायिक रचनेवरून माहिती मिळण्यास मदत होईल. ज्यामुळे बीड जिल्ह्यातील व्यावसायिक रचनेवरून बीड जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची माहिती मिळेल.

## ३) अभ्यास क्षेत्र (Study Region)

बीड जिल्ह्याचे प्राचीन नाव चंपावती नगर असे होते. बिंदुसरा नदीच्या किनारी हे शहर वसलेले आहे. विक्रमादित्य (सहावा) याची बहिण 'चंपावती' हिच्या नावावरून आजच्या बीड शहराचे 'चंपावतीनगर' असे नामकरण झाले. हे शहर प्राचीन काळी चालुक्य, राष्ट्रकुट व यादव साम्राज्याचा भाग होते. त्यांची साक्ष देणारे व वास्तुशैलीचा उत्कृष्ट नमुना असलेले कंकालेश्वर मंदिर आजही शहराची व जिल्ह्याची शोभा वाढविते. बीड जिल्हा पूर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे. सन १९५६साली द्वैभाषिक राज्याच्या वेळी बीड जिल्हा मराठवाड्यात होता. सन १९६० साली महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर हा जिल्हा महाराष्ट्रात समाविष्ठ करण्यात आला.

बीड जिल्ह्याचे स्थान हे महाराष्ट्राच्या मध्य-अग्नेयेस आहे. जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२८' ते १९° २८' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७४° ५४' ते ७६° ५७' पूर्व आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना, पूर्वेस परभणी व लातुर, दक्षिणेस उस्मानाबाद तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे.

जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६९३ चौरस कि.मी. असून जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. यामध्ये बीड, गेवराई, माजलगाव, परळी, धारूर, वडवणी, अंबाजोगाई, केज, पाटोदा, आष्टी व शिरूर (कासार) तालुक्यांचा समावेश होतो.

जिल्ह्यामध्ये बालाघाट पर्वतरांग पसरलेली असून या पर्वतरांगेमुळे उत्तरेकडील सखल प्रदेश गंगथडी व उंचावरील प्रदेश बालाघाट असे दोन भाग पडलेले आहेत. बालाघाट विभागाची समुद्र सपाटीपासूनची उंची ६१० मीटर ते ६७० मीटर असून गंगथडी विभागाची उंची ३६५ ते ४५७ मीटर पर्यंत आहे. जिल्ह्यातील बहुतांश जमीनी पातळ थराच्या व

खडकाळ आहेत, तर गेवराई व माजलगाव तालुक्यातील जमीनी सुपीक व काळ्या रंगाची आहे. जिल्ह्यातील गोदावरी ही महत्त्वाची नदी असून गेवराई व माजलगाव तालुक्यांच्या सीमेवरून वाहते. त्याचप्रमाणे, मांजरा, सिंदफणा, बिंदुसरा व वाण या जिल्ह्यातील इतर मोठ्या नद्या आहेत. माजंरा व सिंदफणा नद्यांचा उगम पाटोदा तालुक्यातील टेकड्यांवरून होतो.

जिल्ह्याचे हवामान उष्ण व कारेडे असून कमीत कमी तापमान १२$^{\circ}$ डिग्री से. व जास्तीत जास्त तापमान ३९.६$^{\circ}$ डिग्री से. एवढे आहे. तर पर्जन्याचे सरासरी प्रमाण ६७४.७७ मी.मी.एवढे आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार बीड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या २५८५९६२ एवढी असून त्यात पुरूषांची संख्या १३५२४६८ व स्त्रियांची संख्या १२३३४९४ एवढी आहे. तर लिंगगुणोत्तर ९१२ एवढे आहे. शहरी लोकसंख्येचे प्रमाण १९.९ असून ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ८०.१ एवढे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण ७३.५३ एवढे असून लोकसंख्येची घनता २४२ आहे. जिल्ह्यामध्ये स्त्री-पुरुषांच्या लोकसंख्या प्रमाणामध्ये तफावत आहे, म्हणून बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास हा विषय निवडलेला आहे.

## ४) गृहितके (Hypothesis)

बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर  व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास या संशोधन विषयावर प्राथमिक अभ्यासाच्या अवलोकनातून खालील गृहीतकृत्यांची निर्मिती करण्यात आली आहेत.

१) बीड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तर घटत आहे.

२) बीड जिल्ह्यात स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाण जास्त आहे.

३) रूढी परंपरा व पुरूषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे लिंगगुणोत्तर कमी आहे.

४) बीड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या प्राथमिक व्यावसायात गुंतलेली आहे.

## ५) संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objective of the study)

बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास या विषयावर संशोधन अधिक सर्वव्यापी होण्यासाठी तसेच संशोधनास निश्चित दिशा प्राप्त करून देण्यासाठी खालील उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत.

१) बीड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरातील स्थल-कालसापेक्ष बदलांचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील वयोगटानुसार लिंगगुणोत्तराचा अभ्यास करणे.

३) अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण-नागरी भागातील लिंगगुणोत्तराचा अभ्यास करणे.

४) बीड जिल्ह्यातील लोकसंख्येच्या व्यावसायिक रचनेचा अभ्यास करणे.

५) बीड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराची व व्यावसायिक रचनेची कारणमिमांसा करणे.

६) अभ्यास क्षेत्रातील लिंगगुणोत्तर समस्यांचे व व्यावसायिक रचनेचे विश्लेषण करून उपाय योजना सुचविणे.

## ६) संशोधन पद्धती आणि माहिती संकलन (Research Methodology and collecting of Information)

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोताचा उपयोग केला जाणार आहे. ही माहिती जिल्हा जनगणना पुस्तिका, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, बीड जिल्हा राजपत्र (गॅझेटियर), प्रकाशित अप्रकाशित नकाशे, शोधनिबंध, पीएच.डी. अहवाल, मासिके, संदर्भ ग्रंथ, सांख्यिकीय कार्यालये, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी मार्फत माहिती संकलित केली जाईल.

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा करण्यात येणार आहे. त्यासाठी मुलाखतीद्वारे तसेच प्रश्नावली भरून घेऊन व प्रत्यक्ष सर्वेक्षण करून निवडक खेड्यांचा नमुना पद्धतीने सूक्ष्म अभ्यास केला जाईल.

संकलित माहितीचे सादरीकरण करण्यासाठी विविध नकाशाशास्त्रीय पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यामध्ये नकाशे, स्तंभालेख, विभाजित वर्तुळ इत्यादी तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच विविध सूत्रांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यात लिंगगुणोत्तर व शेकडेवारी पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

लिंगगुणोत्तर

$$\text{सूत्र - लिंगगुणोत्तर} = \frac{\text{बीड जिल्ह्यातील विशिष्ट कालखंडातील एकूण स्त्रियांची संख्या}}{\text{बीड जिल्ह्यातील त्याच कालखंडातील एकूण पुरूषांची संख्या}} \times 1000$$

## ६) साहित्याचा आढावा (Review of Literature)

**१) चंदना आर.सी. आणि सिंधु एम.एस. (१९७९) -** यांनी ''सेक्स रेसिओ ॲन्ड इटस् डेटरमेन्टस्'' यामध्ये लिंग रचनेबरोबर जन्मदर, मृत्युदर, लिंगरचनेनुसार स्थलांतर, स्त्री-पुरूषांमधील मृत्यूदरातील फरक आणि विशिष्ट वेळेतील स्थलांतरासाठी लिंग पद्धतीने केलेली निवड इत्यादी मांडणी केली.

**२) युसुफ के.एस. (१९९०)** यांनी ''पश्चिम महाराष्ट्रातील लोकसंख्या वैशिष्ट्याचा अभ्यास'' या विषयावर पीएच.डी. संशोधन कार्य केले आहे. यामध्ये त्यांनी विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेवर प्रकाश टाकला आहे.

**३) श्रीवस्त्री आर.के. आणि कौशल राजीव (१९९८) -** यांनी ''चेन्जींग सेक्स रेसिओ इन शिवनी डिस्ट्रीक'' (एम.पी.) यामध्ये त्यांनी संबंधित विभागातील लिंगगुणोत्तराचा बदललेला कल आणि ग्रामीण शहरी लिंगगुणोत्तर प्रमाण वयोगटानुसार आणि जातीनिहाय लिंगगुणोत्तर इत्यादी घटकांचा अभ्यास केला. तसेच त्या भागातील जन्मदर, मृत्युदर हे घटकही लक्षात घेतले. मृत्युदरात प्रामुख्याने महिलांचे प्रमाण जास्त आढळले. तर जन्मदरामध्ये देखील कमी आढळले. त्यावरून भविष्यात त्या भागात लिंगगुणोत्तर असमान झालेले आढळले.

**४) उगाडे व्ही. (२००५) -** यांनी ''ॲन अनालिसिस ऑफ पॉपुलेशन ट्रेन्डस् इन मराठवाडा'' या विषयावर पीएच.डी. शोध-प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची वाढ, जन्मदर व मृत्यूदर, लोकसंख्या स्थलांतर, लिंगरचना, वयोगटरचना, व्यावसाय रचना, ग्रामीण व नागरी लोकसंख्या या विविध घटकांचा जिल्हानिहाय सविस्तर अभ्यास केलेला आहे. यामध्ये त्यांनी सर्व लोकसंख्या वैशिष्ट्यांमध्ये काळानुसार व प्रदेशानुसार झालेला बदल सविस्तर मांडलेला आहे. यामध्ये लोकसंख्या लिंगगुणोत्तरात ऋणात्मक बदल झाल्याचा दिसून आला.

**५) वाघमारे एन.के. (२००९)** यांनी ''नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास'' या विषयावर पीएच.डी. शोध-प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. त्यांना अभ्यास करताना असे आढळून आले की, मुलांच्या जन्मदरापेक्षा मुलींचा जन्मदर कमी आहे. कारण मुलींच्या गर्भाचे जन्माअगोदर गर्भपात होण्याचे प्रमाण जास्त आहे तर मुलांच्या गर्भाचे गर्भपात होत नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तरातील होणारी घट ही महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत जास्त असल्याचे आढळून आले.

**६) तोळमारे एस.एस. (२०१०)** यांनी ''शीख धर्मीय लोकसंख्येच्या भौगोलिक (लोकसंख्याशास्त्रीय) अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा'' या विषयावर पीएच.डी. शोध-प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी नांदेड जिल्ह्यातील शीख धर्मीय लोकसंख्येच्या संदर्भात लिंगरचना, वयोगट रचना, ग्रामीण नागरी रचना, व्यावसायिक रचना इत्यादी घटकांचा अभ्यास कला आहे.

**७) थोरात आर.एम. (२०१०) -** यांनी ''रायगड जिल्ह्यातील लोकसंख्या संसाधनाचा भौगोलिक अभ्यास'' या विषयावर पीएच.डी. शोध-प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये देखील त्यांनी लोकसंख्या लिंगगुणोत्तरामध्ये घट झाल्याचे सांगितलेले आहे.

**८) ताठे एस.व्ही. (२०१०) -** यांनी ''जालना जिल्ह्यातील लोकसंख्या वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास'' या विषयावर पीएच.डी. शोध-प्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी विविध लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. तेव्हा त्यांना अभ्याासावरून असे दिसून आले की, जालना जिल्ह्यामध्ये लोकसंख्या लिंगगुणोत्तर दिवसेंदिवस घटतांना दिसून आले. तसेच व्यावसायिक रचनेमध्ये देखील बदल झाल्याचे दिसून आले.

## ७) प्रकरण योजना (Chapter Scheme)

बीड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तर व व्यावसायिक रचनेचा भौगोलिक अभ्यास या संशोधन विषयाची अभ्यासासाठी मांडणी सहा प्रकरणात करण्यात आली आहे.

### १) प्रकरण पहिले - प्रस्तावना

यामध्ये प्रस्तावना, लोकसंख्या भूगोलाचा अर्थ, व्याप्ती व संकल्पना, अभ्यास क्षेत्र, विषयाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, गृहीतके, संशोधन पद्धती, संबंधित संशोधन कार्याचा आढावा आणि प्रकरण योजना इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

### २) प्रकरण दुसरे - बीड जिल्ह्याची भौगोलिक, आर्थिक व सामाजिक रचना

यामध्ये अभ्यास क्षेत्राची ओळख, स्थान, विस्तार आणि सीमा, ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राकृतिक रचना, हवामान, नद्या, मृदा, नैसर्गिक वनस्पती आणि सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

### ३) प्रकरण तिसरे - बीड जिल्ह्याचे लोकसंख्या लिंगगुणोत्तर

या प्रकरणामध्ये बीड जिल्ह्यातील लोकसंख्या लिंगगुणोत्तराचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये काळानुसार लिंगगुणोत्तरामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच तालुकानिहाय लिंगगुणोत्तर, वयोगटानुसार लिंगगुणोत्तर,

ग्रामीण-नागरी लिंगगुणोत्तर व भारत सरकार व महाराष्ट्र सरकारचे लोकसंख्या विषयक धोरण इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**४) प्रकरण चौथै - बीड जिल्ह्याची व्यावसायिक रचना**

या प्रकरणामध्ये बीड जिल्ह्यातील व्यावसायिक रचनेचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील व्यावसाय, व्यावसाय स्तर रचना, विविध व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकांची संख्या व टक्केवारी इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**५) प्रकरण पाचवे - लिंगगुणोत्तर व व्यवसाय बदलाची कारणे व परिणाम**

या प्रकरणाामध्ये लोकसंख्या लिंगगुणोत्तर कमी असण्याची विविध कारणे व परिणाम तसेच व्यावसाय बदलाची कारणे व परिणाम इ. अभ्यास करण्यात येणार आहे.

**६) प्रकरण सहावे - निष्कर्ष व उपाययोजना**

या प्रकरणामध्ये सारांश, लिंगगुणोत्तर व व्यावसाय बदलाच्या समस्या अभ्यासातून उपाययोजना सूचविण्यात येतील व सूची देण्यात येईल.

**टीप ः** संशोधन कार्याच्या प्रगतीनुसार त्यात बदल संभवनीय आहे.

## संदर्भ ग्रंथ (Bibliography)


१) आर.सी. चान्दना - लोकसंख्या भूगोल, कल्याणी पब्लिकेशन, नवी दिल्ली.

२) प्रा. जोगेंद्र गायकवाड - लोकसंख्या भूगोल, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

३) माजिद हुसैन - मानवी भूगोल, रावत पब्लिकेशन, जयपूर.

४) अर्जून कुंभार - प्रात्याक्षिक भूगोल, सुमेरू प्रकाशन, ठाणे.

५) एच.एन. मिश्रा, विजय पी.सिंग - भूगोल संशोधन पद्धती, रावत पब्लिकेशन, जयपूर.

६) आंतरराष्ट्रीय नियतकालिके (Demographic year book)

७) बीड जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन

८) नियतकालिके व वृत्तपत्रे

दै. लोकसत्ता, मुंबई

दै. लोकमत, औरंगाबाद

दै. सकाळ, औरंगाबाद



**संशोधक विद्यार्थी**

**संतोष सिताराम सोंडगे**

**संशोधन मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. एन.के. वाघमारे**
(एम.ए., सेट, पीएच.डी.)
भूगोल विभागप्रमुख,
इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, नांदेड